## जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलीन करणारे गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणेवर कारवाई कधी होणार?

## त्या तलाठ्याची चौकशी करा;गावातून अवैध वाळू उपसा वाहतुक सांगायचे नाही का? मग तहसीलदार खोमणेला एवढं का झोमलं; जिल्हाधिकारी साहेब, केवळ अहवाल मागवून गेवराई तहसीलदारांना पाठीशी घालू नका

# गेवराई तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन वाहतूक तहसीलदार संदीप खोमणेंचे जाणून बुजून दुर्लक्ष

बीड (सरकार): गेवराई तालुक्यात महसूल विभागाचे प्रमुख तहसीलदार संदीप खोमणेंच्या आशीर्वादाने शासनाची संपत्ती, गौण खनिज, वाळु मुरूम अवैधरित्या उत्खनन करून गैरमार्गाने वाहतुक करून चोरून नेली जात आहे. मात्र यावर कारवाई करण्याऐवजी वारंवारं वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुचना देऊनही त्या सुचनांचे पालन न करणे, जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणे, वारंवारं जिल्हाधिकारी बदलले. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर प्रत्यक्ष उभा राहून अहवाल सादर करण्यापलिकडे काहीही केले जात नाही. त्यामुळे आजही गेवराई तालुक्यात तहसीलदार संदीप खोमणेंच्या आशीर्वादाने अवैधरित्या वाळू, मुरूम उत्खनन आणि वाहतुक होत आहे. मात्र वाळू वाहतुक कारवाई केल्यानंतर गावातील सरपंच व इतर तक्रार करतात. वाळू उपसा असल्याचे सांगतात. असे ऐकले, मग एवढे तहसीलदार खोमणेंना झोंबाय सारखे काय झाले? अवैधरित्या वाळू उपसा वाहतुक होत असेल आणि त्या संदर्भात कोणी माहिती देत असेल तर त्या गोष्टी कोणी उघड केल्या याची सर्व चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी करावी अशी चर्चा होत आहे.





गेवराई तालुक्यात महसूल विभाग नेहमीच शासनाची संपत्ती असलेले मुरूम, वाळू दिवसाढवळ्या रात्री अपरात्री अवैधरित्या उत्खनन करून गैर मार्गाने चोरून नेला जातो. मात्र यावर कारवाई करण्याऐवजी शासनाची संपत्ती चोरीला गेली तर गेली. जिल्हा प्रशासनाची प्रतिमा मलीन झाली तर झाली वरिठ अधिकाऱ्यांचे मी ऐकेल अथवा न एकेल अशा अविर्भावात व शासनाच्यासूचनांचे पालन न करणारे संदीप खोमणे ठरत आहेत. या अगोदर असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर समक्ष उभा राहून अहवाल दिला होता. तरी सुध्दा गेवराई तहसीलदार संदीप खोमणेच्या कारभारात सुधारणा झाली नाही . उलट जास्त प्रमाणात शासनाची संपत्ती चोरीला गेली. एवढेच नव्हे तर तहसीलदार संदीप खोमणेच्या काळात शासन प्रशासनाचा कोट्यावधीचा महसूल पाण्यात गेला. तरी सुध्दा तहसीलदार संदीप खोमणेचा कारभार सुधारले नाहीत. आताचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हा प्रशासनाची प्रतिमा आपल्या कारभारामुळे मलीन होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनाचे पालन करत नाहीत असे अनेक नोटीस देऊन प्रत्यक्ष समोर येऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र एवढे झाल्यानंतरही तहसीलदार खोमणे यांचा कारभार सुधारला नाही.मात्र एखाद्या गावातून सरपंच अथवा इतर व्यक्ती अवैधरित्या परवाना नसताना वाळू उपसा होत असेल त्याची तक्रार माहिती सांगीतली तर तहसीलदार खोमणेला एवढे झोंपायचे काय कारण मात्र ही गुप्त गोष्ट उघड कोणी केली? कशी केली या सर्व गोष्टीची चौकशी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्या तलाठ्याच्या मोबाईलवरून जे बोलणे झाले आहे त्याचीही चौकशी करून तलाठ्याने नेमक तहसीलदारच्या कारभाराचा एक प्रकारे कसा कारभार आहे हे दाखवून दिले आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन त्या तलाठ्याला जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून मोबाईलची तपासणी करावी. त्याचबरोबर तहसीलदारचे काय चुकले, काय करायला हवे होते काही करायला नको होते नेमके या बोलण्यात काय तथ्य आहे. काय झाकून ठेवले आहे. वाळूतील कोणता खुलासा वरती येण्याची शक्यता वर्तविली जाते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचना, नियमाचे उल्लंघन करणाऱ्या तहसीलदार खोमणेच्या गंभीर स्वरुपाचा अहवाल पाठवावा आणि कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा अशी चर्चा होत आहे.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २८० वा ■ शुक्रवार १८ जुलै २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १९ जुलै २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 280 ■ Friday 18 Jully 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## उमाकिरण अत्याचार प्रकरण:एसआयटी दाखल

# आयपीएस तेजस्विनी सातपुते बीडमध्ये

## माजी मंत्री धनंजय मुंडेंनी केली होती एसआयटीची मागणी



बीड (सरकार): उमाकिरण शैक्षणिक संकुलातील अल्पवयीन विद्यार्थिनीवरील कथित लैंगिक अत्याचार प्रकरणाचा तपास आता निर्णायक वळणावर आला आहे. राज्य सरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) बीडमध्ये तळ ठोकत चौकशीला गती दिली आहे. आयपीएस तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील दहा सदस्यीय पथक हे प्रकरण बारकाईने तपासत असून, या पथकात एकाही स्थानिक पोलिस अधिकारी कर्मचाऱ्याचा यात समावेश नाही, ही बाब विशेष लक्षवेधी ठरली आहे.

तपासापासून बीड पोलिसांना जाणीवपूर्वक दूर ठेवले आहे. कारण आरोपीला फरार करण्यास स्थानिक आमदार यांचा हात असल्याचा आरोप माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केला होता. त्यामुळे राजकीय दबाव न येता याचा निष्पक्षपती तपास व्हावा. उमाकिरण कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या एका १७ वर्षांच्या विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप वर्ग चालवणारे विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांच्यावर आहे. या दोघांविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दोन गुन्हा दाखल करण्यात आले असून, सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप झाल्याच्या आरोपानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी एसआयटीची घोषणा केली होती. त्यानंतर दहा-बारा दिवसांत पथक स्थापन करण्यात आले आणि आता बीडमध्ये तपास सुरू झाला आहे.

एसआयटी संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करणार असून, अत्याचार झाल्याच्या तक्रारीचा ठोस पाठपुरावा केला जाणार आहे. या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा दबाव, राजकीय हस्तक्षेप किंवा प्रकरण दाबण्याचा प्रयत्न झाला का, याचा स्पष्ट खुलासा या तपासातून होणार आहे. एसआयटीच्या कार्यवाहीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारच्या गंभीर प्रकरणांत सरकारने थेट एसआयटीमार्फत हस्तक्षेप केल्याने भविष्यातील घटनांना आळा बसू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## राज्यातील अनाथ मुला-मुलींना शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत

मुंबई (सरकार): राज्यातील अनाथ मुला-मुलींसंदर्भात राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. अनाथ मुला-मुलींना शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिव्यांगांच्या धरतीवर अनाथांना एक टक्का आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारनं घेतलाय. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ८ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी आल्यास शिक्षण संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा महिला आणि बालविकास अधिकाऱ्याकडे शिफारस करावी. असे आवाहन राज्य शासनाच्या वतीने करण्यात आलं आहे.

दरम्यान, अनाथ बालकांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून १००% शिक्षण आणि परीक्षा शुल्कात सवलत मिळणार आहे. राज्य सरकारचा हा अतिशय महत्वाचा निर्णय असून राज्यातील अनेक अनाथ मुला-मुलींना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच शासकीय निमशासकीय शासकीय अनुदान असलेल्या संस्थांमध्ये योजना लागू राहणार असल्याची ही माहिती पुढे आली आहे. दिव्यांगांच्या धरतीवर अनाथांना एक टक्का आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. तर या योजनेचा लाभ घेण्यासाठी सदर विद्यार्थी हा महाराष्ट्रातील रहिवासी असला पाहिजे, अशी अट ठेवन्यात आली आहे.

## माझ्यावर गुन्हा दाखल करण्यापेक्षा माझा एन्काऊंटवर करा-ज्ञानेश्वरी मुंडे

बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात १८ महिन्यांपूर्वी महादेव मुंडे नावाच्या एका उद्योजकाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणात तुरुंगात असलेला वाल्मिक कराडवर गंभीर आरोप केले जात आहेत. बीडच्या पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयासमोर आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल केला आहे. हा अदखलपात्र गुन्हा आहे. एकीकडे १८ महिन्यांपासून महादेव मुंडे हत्या प्रकरणात कोणतीच कारवाई केली जात नसताना आता न्यायासाठी लढणाऱ्या ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यावरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माझ्यावर गुन्हा दाखल करण्यापेक्षा माझा एन्काऊंटर करा असा सवाल पोलीस प्रशासनाला उद्देशून ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांनी मला दहा मिनिटांचा वेळ द्यावी आणि १८ महिने पोलीसांनी काय केले असा प्रश्न मी मुख्यमंत्र्यांना भेटल्यानंतर विचारेल असेही मुंडे यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले.



या हत्याकांडाला १८ महिने उलटूनही अद्याप याप्रकरणी कुणालाही अटक करण्यात आली नाही. अनेकदा तपास अधिकारी बदलण्यात आले. मात्र कोणतीही ठोस कारवाई अद्याप केली नाही. त्यामुळे मयत महादेव मुंडेंच्या पत्नी ज्ञानेश्वर मुंडे बुधवारी आक्रमक झाल्या. त्यांनी पतीच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पण कारवाई होत नसल्याने त्यांनी विष प्राशन करत आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यांच्यावर सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.पण महादेव मुंडे खून प्रकरणाला आता वेगळं वळण मिळालं आहे. पोलिसांनी पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. बीडच्या पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयासमोर आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल केला आहे. हा अदखलपात्र गुन्हा आहे. एकीकडे १८ महिन्यांपासून महादेव मुंडे हत्या प्रकरणात कोणतीच कारवाई केली जात नसताना आता न्यायासाठी लढणाऱ्या ज्ञानेश्वरी मुंडे यांच्यावरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, माझ्यावर गुन्हा दाखल करून पोलीस प्रशासनाला काय मिळणार आहे. त्यामुळे माझा एन्काऊंटर करा असे जळजळीत प्रतिउत्तर पोलीस प्रशासनाच्या १८ महिन्याच्या दुर्लक्षित केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने ज्ञानेश्वरी मुंडेंनी केला आहे. मात्र पुढच्या महिन्यात पुन्हा मी पोलीस प्रशासनाची भेट घेऊन आरोपीवर काय कारवाई केली या संदर्भात प्रश्न विचारेल. जर मला न्याय मिळाला नाही तर मुख्यमंत्र्यांची भेट घेणार व पोलीसांनी चौकशीत दिरंगाई केली . नेमके कोणामुळे केली हे सविस्तर मी बोलेल असे ज्ञानेश्वरी मुंडे माध्यमांशी बोलताना म्हणाल्या.

## चौदाव्या आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीत अनियमितता आणि अपहार

# माजी सरपंच,अभियंत्यांसह ग्रामसेवकांवर गुन्हा

धारूर (सरकार): तालुक्यातील सुर नरवाडी येथे ग्रामपंचायतीला शासनाकडून मिळालेल्या चौदाव्या आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीत अनियमितता आणि अपहार करण्यात आला. एकूण १७ लाख ७९ हजार रुपयांचा भ्रष्टाचार प्रशासनाच्या चौकशीनंतर समोर आला आहे. आ. प्रकाश सोळंके यांच्या तक्रारीनंतर ही चौकशी सुरू झाली होती. याप्रकरणी विस्तार अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून तत्कालीन महिला सरपंच, दोन माजी ग्रामसेवक आणि २ शाखा अभियंता यांच्या विरोधात सिरसाळा पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला.

धारूर तालुक्यातील सुरनरवाडी ग्रामपंचायतीने पंधरावा वित्त आयोग आणि रोजगार हमी योजनेच्या कामात अपहार केल्याची तक्रार आ. प्रकाश सोळंके यांनी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दिली होती. त्यानंतर माजलगाव गटविकास अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने चौकशी करून ३१ डिसेंबर २०२४ रोजी याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे दिला होता.

या अहवालानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अनियमितता आणि अपहार याबाबत जबाबदारी निश्चित करून सरपंच लता चंद्रसेन काळे, प्रशासक तथा शाखा अभियंता बी. एन. पवार, ग्रामसेवक आर. के. चौरे, ग्रामसेवक विजय राठोड व शाखा अभियंता एम. एल. सय्यद यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागवला होता. सर्वांनी खुलासे सादर केले होते. मात्र हे खुलासे अमान्य करण्यात आले. याप्रकरणी ५ लाख ३१ हजार ८९९ रुपयांची अनियमितता आणि १२ लाख ४७ हजार ३५० रुपयांचा अपहार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले.त्यामुळे विस्तार अधिकारी बाबूराव राऊत यांच्या तक्रारीवरून सुरनरवाडीच्या माजी सरपंच लता चंद्रसेन काळे, शाखा अभियंता तथा तत्कालीन प्रशासक बी. एन. पवळ, माजी ग्रामसेवक आर. के. चौरे, ग्रामसेवक विजय राठोड, शाखा अभियंता एम. एल. सय्यद यांच्याविरोधात सिरसाळा पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.याबाबत आ प्रकाश सोळंके यांनी या अपहरणाची चौकशी करण्याची मागणी केली होती. संबंधित गुन्ह्याचा पुढील तपास सिरसाळा पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक दहिफळे करीत आहेत.शासनाच्या १४ व्या व १५ व्या वित्त आयोगातून हायमास्ट दिवे बसवणे, सौर पथदिवे बसवणे, अंगणवाडी खेळणी खरेदी, पाण्याचा हौद बांधणे, भूमिगत नाली बांधकाम, कचराकुंडी बसवणे, एलईडी खरेदी, ग्रामपंचायतीला फर्निचर खरेदी, विंधन विहिरी, जि. प. शाळा दूरुस्ती या कामात हा अपहार झाला व अनियमितता झाली. चौकशी अहवालामध्ये सर्वांनी आपल्या पदाचा वापर करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हे काम केल्याचे म्हटले आहे. पद व मिळालेल्या अधिकारांचा गैरवापर करण्यात आल्याचा ठपका ठेवला गेला आहे. त्यामुळे सर्वांवर गुन्हा नोंद करण्याची शिफारस करण्यात आली होती.

सरपंच काळे यांच्या काळात १४ व्या वित्त आयोगात २ लाख ६५,९४९ रुपये, १५ व्या वित्त आयोगात ३ लाख ३५ हजार ३४९ रुपये असा एकूण ६ लाख १ हजार २९९ रुपये, तर शाखा अभियंता पवळयांच्या प्रशासक काळात १ लाख ४८ हजार रुपयांचा अपहार झाला आहे. ग्रामसेवक आर. के. चौरे यांच्या काळात ४ लाख ८३ हजार ३४९ रुपयांचा अपहार झाला आहे. ग्रामसेवक विजय राठोड यांच्या काळात २ लाख ६५ हजार ९४९ रुपयांचा अपहार आहे. शाख अभियंता सय्यद यांनी २ लाख ८१ हजार ६५१ रुपयांचा अपहार झाल्याचा चौकशीअंती समोर आले.

## विधानसभा लॉबीत राडा प्रकरण भोवलं

# दोन्ही गटाच्या पदाधिकाऱ्यावर गंभीर गुन्हे दाखल

मुंबई (सरकार): राज्याचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे, याचदरम्यान गुरुवारी विधानसभा लॉबीमध्ये जोरदार राडा झाला. राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड आणि भाजप नेते गोपिचंद पडळकर यांचे समर्थक एकमेकांना भिडले. यामुळे चांगलाच गोंधळ उडाला असून, आरोप-प्रत्यारोपानं राजकारण तापलं आहे. या प्रकरणाची आता विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गंभीर दखल घेतली आहे.

ज्यांनी राडा घातला त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येत असल्याचं नार्वेकर यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, कोणत्याही स्वरूपाची परवानगी नसताना व अनधिकृतपणे हे अभ्यांगत सदस्यांसोबत आले. हे आक्षेपार्ह कृत्य आहे. विधानभवन सभागृहात असे कधीही झाले नाही. मुळात त्या अभ्यांगतांना आत आणायची काहीही गरज नव्हती. असे अभ्यांगत आले तर त्यांची जबाबदारी संबंधित आमदारांची असते. या अप्रिय घटनेनंतर मी सर्व आमदारांना सांगत आहे, विधीमंडळाची परंपरा जपण्याचे उत्तरदायित्त्व हे आमदारांचे आहे.आमदारांचे वर्तन हे विधीमंडळाची प्रतिमा उंचावणारे असावे, अशा पवित्र ठिकाणी सर्वांनीच काही नियम पाळणे गरजेचे आहे. म्हणूनच लोकसभेच्या धर्तीवर नितीमूल्य समिती गठीत केली जाईल, याबाबतचा निर्णय एका आठवड्यात घेतला जाईल. लोकसभेत यापूर्वी खासदारांचे निलंबनच नव्हे तर सदस्यत्व देखील रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व आमदारांनी या समितीचे गांभीर्य घ्यावे, असा इशारा यावेळी नार्वेकर यांनी दिला आहे.

## संपादकीय

# अमेरिकेच्या नवीन कायद्याची डोकेदुखी

अमेरिकेच्या 'वन बिग ब्यूटीफुल' विधेयकामुळे अमेरिकेच्या शेअर बाजारात तात्पुरती तेजी येईल; परंतु यामुळे व्याजदर जास्त काळासाठी उच्च राहू शकतात. त्यामुळे दीर्घकाळासाठी ते चांगले नाही. यामुळे गुंतवणूक कमी आकर्षक बनतील. स्थलांतरितांसाठी अमेरिकेत पोहोचणे अधिक कठीण झाले आहे. अमेरिकेत मंजूर झालेले नवे विधेयक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पच्या २०१७ च्या करकपातीला कायमस्वरूपी बनवण्याबरोबरच 'अमेरिका फर्स्ट' अजेंड्याच्या परतफेडीचे संकेत देते. या कायद्याद्वारे सरकारने संरक्षण, सीमा सुरक्षा आणि ऊर्जा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची योजना आखली आहे. करसवलत आणि देशांतर्गत सुरक्षा मजबूत करणे हा त्यामागील महत्त्वाचा उद्देश आहे. विधेयकातील सर्वात मोठा निर्णय म्हणजे ट्रम्प यांच्या काळात सुरू झालेली करसवलत. ती लवकरच संपणार होती, पण आता कायमस्वरूपी करण्यात आली आहे. याशिवाय सरकारने इमिग्रेशनबाबतही कठोर भूमिका घेतली आहे. या विधेयकात अमेरिका-मेक्सिको सीमेवर भिंत बांधण्यासाठी ४६ अब्ज डॉलर्स, स्थलांतरितांना ठेवण्यासाठी मोठे डिटेन्शन सेंटर बांधण्यासाठी ४५ अब्ज डॉलर्स आणि इमिग्रेशन एजन्सी आयसीईसाठी दहा हजार जणांच्या नवीन भरतींचा प्रस्ताव समाविष्ट आहे. एक काळ असा होता, जेव्हा अमेरिकेला स्वप्नांचा देश म्हटले जात असे. तिथे जगभरातून लोक चांगल्या भविष्याच्या शोधात येत असत; पण आता स्थलांतराशी संबंधित नियम इतके कडक होत आहेत की, निर्वासित आणि स्थलांतरित कामगारांना अमेरिकेत पोहोचणे पूर्वीइतके सोपे राहिलेले नाही. ताजा कायदा अमेरिकेची आर्थिक स्थिती मजबूत करू शकतो; परंतु दीर्घकाळात देशावरील कर्जाचा बोजा वाढवेल. तसेच याचा परिणाम अमेरिकेच्या मोकळ्या मनाच्या आणि जागतिक भूमिकेवरही होऊ शकतो.

हे विधेयक केवळ एक आर्थिक पाऊल नाही, तर ट्रम्प यांची धोरणे अमेरिकन धोरणनिर्मितीत, विशेषतः सीमा सुरक्षेच्या आणि राष्ट्रीय हितांना सर्वोच्च स्थान देण्याच्या बाबतीत मोठी भूमिका बजावत आहेत, हे दाखवते. हे विधेयक धाडसी, पण फूट पाडणारे म्हणून पाहिले जाऊ शकते. एकांगी वृत्ती आणि वादग्रस्त तरतुदींमुळे ट्रम्प यांचे कायदेशीर यश आणि सार्वजनिक स्वीकृती मर्यादित झाली. हे विधेयक अमेरिकन कामगारांचे संरक्षण, राष्ट्रीय सार्वभौमत्व राखणे आणि कायदा आणि सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी ट्रम्प यांच्या लोकप्रिय दृष्टिकोनाचे प्रतिबिंब ठरते. अमेरिकेमध्ये मंजूर झालेले ८६४ पानांचे 'बिग ब्यूटीफुल' विधेयक भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी चिंतेचे कारण ठरू शकते. या कायद्यातील दोन प्रमुख तरतुदी थेट आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांवर परिणाम करतील. एक म्हणजे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्जाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे आणि दुसरे विद्यापीठांच्या देणगी निधीवरील कर वाढवण्यात आला आहे. या देणगी निधीद्वारे परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेतील अनेक प्रतिष्ठित विद्यापीठांमध्ये महागडे शिक्षण घेता आले; परंतु नवीन कायद्यानुसार या निधीवर कर लावण्याची तरतूद आहे. विद्यार्थी कर्जावर मर्यादा घातल्याने अमेरिकेची शिक्षण व्यवस्था भारतासह अनेक देशांमधील विद्यार्थ्यांसाठी आणखी महाग आणि कठीण होईल. यामुळे अमेरिकेच्या विकासातील जागतिक प्रतिभेचा सहभागही मर्यादित होऊ शकतो.


ट्रम्प यांच्या या पावलामुळे पुढील दहा वर्षांमध्ये अमेरिकेची सुमारे ३०० अब्ज डॉलरची बचत होईल; परंतु हे पाऊल आंतरराष्ट्रीय प्रतिभेला निराश करू शकते. अमेरिकेच्या नवोन्मेष क्षमतेवर आणि जागतिक स्पर्धात्मकतेवर यामुळे परिणाम होईल. या विधेयकामुळे वाढत्या व्हिसा खर्चासह एनआरआय गुंतवणूक, भारतीय रिअल इस्टेट आणि पैसे पाठवण्यावर दूरगामी आर्थिक परिणाम होऊ शकतो. व्हिसा नियम कठोर होत असताना आणि अमेरिकेतील भारतीय व्यावसायिकांची नोकरीची सुरक्षा अस्थिर होत असताना, बरेच लोक त्यांचे दीर्घकालीन गुंतवणूक निर्णय पुढे ढकलू शकतात किंवा पुनर्विचार करू शकतात. भारतीय शेअर बाजारातील अनिवासी भारतीय गुंतवणूक, म्युच्युअल फंड आणि व्यवसाय उपक्रमांवर याचा थेट परिणाम होऊ शकतो. आतापर्यंत अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांच्या आर्थिक स्थिरतेमुळे शेअर बाजाराला मोठा आधार मिळाला होता. नवीन अमेरिकन विधेयकानुसार यापुढे अमेरिकेत राहणाऱ्या; परंतु अमेरिकन नागरिक नसलेल्या भारतीय नागरिकांना भारतात पैसे पाठवताना प्रत्येक वेळी ३.५ टक्के कर भरावा लागू शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेवरही या निर्णयाचा थेट परिणाम होईल. संयुक्त अरब अमिरातीनंतर अमेरिका हे भारतीय स्थलांतरितांसाठी दुसरे सर्वात लोकप्रिय ठिकाण आहे. मोठ्या संख्येने अनिवासी भारतीय तेथे काम करतात आणि दरवर्षी अब्जावधी डॉलर्स भारतात पाठवतात; परंतु नवीन विधेयकामुळे अमेरिकेतून पाठवण्यात येणाऱ्या एकूण रकमेत घट होऊ शकते. त्यामुळे भारताच्या एकूण रेमिटन्स उत्पन्नावर परिणाम होईल.

हे विधेयक थेट राजनैतिक संबंध बदलत नाही, तर भारतीय हितसंबंधांवर खोलवर परिणाम करते. ट्रम्प यांचे हे विधेयक भारत आणि अमेरिकेतील विश्वास आणि तांत्रिक भागीदारीबाबत नवीन तणाव निर्माण करू शकते. गेल्या काही दशकांपासून भारतीय व्यावसायिकांनी अमेरिकन तंत्रज्ञान क्षेत्राला नवी ऊर्जा दिली आहे, मग तो नवोपक्रम असो, स्टार्टअप्स असो किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा कणा बनणे असो. व्हिसा शुल्कात जलद वाढ, ग्रीन कार्ड कोट्यात कपात आणि इमिग्रेशनसंदर्भात कडक तरतुदी या भागीदारीच्या पायाला धक्का देऊ शकतात. हे विधेयक स्पष्ट संदेश देते की, आता आर्थिक राष्ट्रवादाला परस्पर सहकार्याच्या वर ठेवले जाईल. यामुळे भारतातील प्रतिभा आणि स्टार्टअप्स इतर देशांकडे झुकू शकतात. यामुळे केवळ अमेरिकेची तंत्रज्ञान शक्ती कमकुवत होणार नाही, तर ते भारत-अमेरिका संबंधांच्या धोरणात्मक अक्षांनाही धक्का देऊ शकते. हे विधेयक भारत आणि अमेरिकेतील व्यापक धोरणात्मक आणि राजनैतिक संबंधांमध्ये थेट बदल करत नसले, तरी हजारो भारतीय विद्यार्थी, तंत्रज्ञान कर्मचारी आणि व्यावसायिक हितसंबंधांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच भारताने या मुद्द्यावर अमेरिकेशी बोलण्यासाठी पुढाकार घ्यावा. गरज पडल्यास भारतीय विद्यार्थी आणि स्टार्टअप्ससाठी आर्थिक सहकार्याचे एक मॉडेलदेखील तयार करावे लागेल जेणेकरून अमेरिकन मदतीवरील अवलंबित्व कमी करता येईल. या विधेयकाचा मोठा परिणाम भारत आणि अमेरिकेतील तंत्रज्ञान प्रतिभेच्या देवाण-घेवाणीवर होईल.नव्या विधेयकामुळे एच-१ बी व्हिसावर नियंत्रण किंवा शुल्कवाढ यासारख्या धोरणांमुळे तंत्रज्ञान कंपन्यांची प्रतिभा पुरवठा साखळी विस्कळीत होईल. टीसीएस, विप्रोसारख्या भारतीय आयटी कंपन्यांनी आधीच अमेरिकेत स्थानिक भरतीवर भर देण्यास सुरुवात केली असून एच-१बी विसाचा वापर ५६ टक्क्यांनी कमी केला आहे. यामुळे भारतीय तंत्रज्ञान व्यावसायिकांसाठी अमेरिकन संधींचे दरवाजे कमी होऊ शकतात.एच-१ बी व्हिसा शुल्कात ५० टक्क्यांपर्यंत वाढ करणे आणि ग्रीन कार्ड कोटा कमी करणे यांसारख्या पावलांमुळे आता भारतीयांसाठी अमेरिकन ड्रीम खूप महाग आणि कठीण बनत आहे. भारतीयांसाठी ग्रीन कार्डची प्रतीक्षा यादी आधीच मोठी आहे. ती आणखी कमी केली, तर अनेक कुटुंबांसाठी स्थिरता आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता वाढेल. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणांचा दोन्ही देशांमध्ये कार्यरत असलेल्या भारतीय उत्पादन आणि लॉजिस्टिक्स कंपन्यांवरही परिणाम होईल. त्यांना व्यावसायिक खर्चात वाढ होण्यास सामोरे जावे लागेल. त्यामुळे जागतिक स्पर्धेत त्या मागे पडण्याचा धोका आहे.

# अपयशी ठरलेले पालक

आलकांना असलेला तीव्र ताण आणि मानसिक आरोग्याच्या समस्या अशा वागणुकीसाठी कारणीभूत ठरतात. पालक अनेकदा तीव्र ताण, नैराश्य, चिंता किंवा इतर मानसिक आरोग्य समस्यांनी ग्रासलेले असतात. आर्थिक समस्या, नातेसंबंधातील संघर्ष, कौटुंबिक कलह किंवा कामाचा ताण यामुळे ते मानसिकदृष्ट्या अस्थिर होतात आणि अशा परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता गमावतात. अशा स्थितीत, मुलांच्या लहान चुकाही त्यांना असह्य वाटू शकतात आणि त्यातून ते हिंसक होतात. पालकत्वाचा ताण, सततच्या जबाबदाऱ्या, मुलांची काळजी घेणे, मुलांच्या गरजा पूर्ण करणे, आर्थिक भार आणि सामाजिक अपेक्षा यामुळे पालकांना प्रचंड ताण येऊ शकतो, ज्यामुळे ते 'बर्नआऊट' होतात. अशा परिस्थितीत ते चिडचिडे होतात आणि त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. आपलं मूल मागे पडणार नाही ना, ते योग्य वळणावर, वाटेवर राहील ना, त्याच्या कोणत्याही कृत्यामुळे आपली बदनामी होणार नाही ना? आपलीच मुलं आपल्याला समाजात मान खाली घालायला लावतील का? आपण त्यांच्यावर केलेल्या शैक्षणिक खर्चाचं ते सार्थक करतील का? अशा सततच्या नकारात्मक विचारांमुळे पालक त्रस्त असतात. राग आणि निराशा या बाबी पालकांना सतत अस्वस्थ करतात. पालकांना स्वतःच्या आयुष्यातील अपयश, निराशा किंवा अपेक्षेप्रमाणे गोष्टी न घडल्यामुळे प्रचंड राग येऊ शकतो. हा राग अनेकदा मुलांवर काढला जातो. कारण मुले त्यांच्या नियंत्रणाखाली असतात आणि स्वतःचा बचाव करू शकत नाहीत. मुलांना सतत धाकात, दाबावात, शिस्तीत ठेवणं म्हणजेच पालकत्व अशी धारणा अनेकांची असते. अनेक पालकांना त्यांच्या लहानपणी जे काही व्हायचं होतं, करायचं होतं, मिळवायचं होतं ते परिस्थितीअभावी करता आलेलं नसतं. असे पालक मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात टाकण्यापेक्षा स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात जायला जबरदस्ती करतात आणि त्यात अपेक्षा पण खूप ठेवतात. मुलांना जर लादलं गेलेलं करिअर यशस्वीरीत्या पार नाही पाडता आले तर त्यांना दोष देणे योग्य नाही.

स्वत:वरील अवास्तव अपेक्षा आणि सामाजिक दबाव या कारणास्तव पालक आपली विचारसरणी सांभाळू शकत नाहीत. समाजात 'आदर्श पालक' असण्याचा दबाव प्रचंड असतो. जर



मुलांनी अपेक्षेनुसार कामगिरी केली नाही किंवा त्यांच्याकडून चुका झाल्या तर पालकांना स्वतःची निराशा वाटते आणि ते स्वतःला अपयशी समजतात. आपणच कुठेतरी मुलांना घडवण्यात कमी पडलो, आपल्या संस्कारात कमतरता राहिली, आपल्याला योग्य आदर्श मुलं तयार करता आली नाहीत यातून ते कधीकधी टोकाची भूमिका घेतात. कोणतंही मूल आणि कोणताही पालक शंभर टक्के योग्य किंवा आदर्श कधीच नसतो हे समजणे गरजेचे आहे. पालकांचा बालपणीचा अनुभव सगळ्यात महत्त्वाचा असतो. काही पालकांनी स्वतः बालपणी शारीरिक किंवा मानसिक अत्याचार अनुभवले असतील. यामुळे त्यांना आक्रमकतेचे किंवा हिंसाचाराचे वर्तन सामान्य वाटू शकते आणि ते आपल्या मुलांशीही त्याच पद्धतीने वागू शकतात. काही घरात जुन्या वळणानुसार पालकांना त्यांच्या आई-वडिलांनी मारहाण करणे, कठोर शिक्षा देणे, उपाशी ठेवणे, कोंडून ठेवणे, घराबाहेर काढणे, त्याच्याशी दीर्घ काळ अबोला धरणे, शिवीगाळ करणे, चटके देणे, बांधून ठेवणे असे प्रकार केलेले असतात. अशा वातावरणात मोठी झालेली पालक मंडळी या गोष्टीला खूप गांभीर्याने घेत नाहीत आणि आताच्या पिढीतील मुलांना पण क्रूरतेने वागवणे म्हणजे शिस्त लावणे असेच समजतात. आम्ही कसं सगळं सहन केलं तसंच आमच्या मुलांनी पण करावे अशा चुकीच्या अपेक्षा मुलांकडून ठेवणे म्हणजे मूर्खपणा आहे.

मद्यपान आणि अमली पदार्थांचे सेवन करण्याची सवय जर पालकांना असेल तर त्यांची हिंसक प्रवृत्ती अजून उफाळून येते. मद्यपान किंवा अमली पदार्थांच्या प्रभावाखाली व्यक्तीच्या विचारशक्तीवर आणि निर्णयक्षमतेवर परिणाम होतो. यामुळे पालक अनियंत्रित होऊन मुलांना इजा पोहोचवू शकतात. भावनात्मक संबंधांचा अभाव हा पण महत्त्वाचा मुद्दा असून, काही पालकांचा आपल्या मुलांशी भावनिक संबंध चांगला नसतो. यामुळे त्यांना मुलांबद्दल सहानुभूती वाटत नाही आणि ते त्यांच्यावर सहजपणे राग काढू शकतात. अनेकदा मुलगा हवा होता पण मुलगी झाली, दोन्ही मुलंच झाली किंवा तिन्ही मुलीचं झाल्या या तुलनात्मक वातावरणामुळे लहानपणापासून असे पालक मुलांशी व्यवस्थित संवाद, नातं, आपलेपणा निर्माण करू शकलेले नसतात. मूल जन्माला घातलं, कर्तव्य केली, त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडतोय इतकंच औपचारिक नातं अशा पालकांमध्ये आणि मुलांमध्ये पाहायला मिळते. आपल्याच मुलांमध्ये पालक भेदभाव करतात, दुय्यम वागणूक देतात, कोणावर जास्त प्रेम तर कोणाचा तिरस्कार करतात. समाजातील वाढती हिंसा आणि असंवेदनशीलता यामुळे निर्दयी होत चाललेले मन आणि मृत होत चाललेल्या भावना सुद्धा हिंसक प्रवृत्तीला कारणीभूत असतात. समाजात एकूणच हिंसा आणि असंवेदनशीलता वाढत असल्याने, लोकांना जीवनाचे मूल्य कमी वाटू लागले आहे. यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागते आणि त्याचे परिणाम कौटुंबिक स्तरावरही दिसू लागले आहेत. एखाद्याचा जीव घेणं हाच रागावरील तोडगा आहे इतक्या सहजासहजी लोक खून करतात. अशा गंभीर समस्यांवर आपण काय उपाययोजना करू शकतो अशा घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि अशा घटना रोखण्यासाठी काही उपाययोजना महत्त्वाच्या आहेत यावर देखील आपण बोलणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्य सेवा आणि समुपदेशनाचे महत्त्व लक्षात घेऊन, पालकांसाठी मानसिक आरोग्य तपासणी आणि समुपदेशन सेवा सहज उपलब्ध असाव्यात. विशेषतः नवीन पालकांसाठी आणि ज्यांना पालकत्वाचा ताण जाणवत आहे, त्यांच्यासाठी समुपदेशन अनिवार्य करावे. शाळांना, क्लासेसमध्ये, महाविद्यालयांना असे समुपदेशन सत्र आयोजित करणे बंधनकारक असावे.

## घरी बॉडी लोशन बनवण्यासाठी...

नारळ तेल - २ चमचे, शिया बटर - २ टेबलस्पून, एलोवेरा जेल - १ टेबलस्पून, बदाम तेल - १टेबलस्पून, गुलाबजल - २ टेबलस्पून

१. प्रथम शिया बटर आणि खोबरेल तेल वितळवा. एका लहान भांड्यात शिया बटर आणि खोबरेल तेल मंद आचेवर वितळवा.

ते चांगले मिसळा आणि ते वितळले की गॅसवरून उतरवा. काही वेळ थंड होऊ द्या.२. कोरफड आणि बदाम तेल मिसळा हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर त्यात कोरफडीचे जेल आणि बदाम तेल घाला. ते चांगले मिसळा जेणेकरून सर्व घटक चांगले मिसळतील. ३. गुलाबजल आणि आवश्यक तेले घाला आता गुलाबजल आणि काही थेंब लैव्हेंडर किंवा व्हिटॅमिन ई तेल (पर्यायी) घाला. मिश्रण पुन्हा एकदा चांगले फेटून घ्या जेणेकरून मिश्रण मलईदार आणि गुळगुळीत होईल. ४. मिश्रण थंड होऊ द्या आणि एका कंटेनरमध्ये ठेवा.हे लोशन हवाबंद डब्यात ठेवा. थंड झाल्यावर, हे लोशन थोडे जाड होईल आणि लावायला सोपे होईल. ५. कसे वापरावे आंघोळीनंतर किंवा जेव्हा जेव्हा त्वचा कोरडी वाटेल तेव्हा हे लोशन संपूर्ण शरीरावर हळूवारपणे लावा. विशेषतः हात, पाय, कोपर आणि गुडघ्यांवर जास्त लावा कारण हे भाग जास्त कोरडे होतात.

## तांब्याच्या बाटलीत पाणी पिण्याचे फायदे

**१. अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म:** तांबे हे एक नैसर्गिक अँटी-बॅक्टेरियल एजंट आहे जे पाण्यात असलेले हानिकारक बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करते. **२. पचन सुधारते:** तांबे पचन सुधारण्यास मदत करते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम देते. **३. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे:** तांबे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते आणि शरीराचे संक्रमणांपासून संरक्षण करते. ४. रक्तदाब नियंत्रण: तांबे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. **५. त्वचेसाठी फायदेशीर:** तांबे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करते.

जर तांब्याची बाटली व्यवस्थित स्वच्छ केली नाही तर त्यात तांब्याचे साठे येऊ शकतात. जास्त प्रमाणात तांब्याचे सेवन केल्याने तांब्याची विषाक्तता होऊ शकते, ज्यामुळे उलट्या, मळमळ, पोटदुखी, अतिसार आणि डोकेदुखी यासारख्या समस्या उद्भवू शकतात. काही लोकांना तांब्याची ॲलर्जी असू शकते,



ज्यामुळे त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे आणि सूज येणे असे होऊ शकते. तांब्याच्या बाटलीत साठवलेले पाणी हिरवे किंवा निळे होऊ शकते, जे तांबे साठल्याचे लक्षण आहे.

## कुट्टूचे पीठ वरदान आहे

कुट्टूचे पीठ, ज्याला बकव्हीट पीठ असेही म्हणतात, हे बकव्हीट वनस्पतीच्या बियांपासून बनवलेले एक प्रकारचे पीठ आहे. हे पीठ ग्लूटेन-मुक्त आहे, म्हणून ज्यांना ग्लूटेनची ॲलर्जी आहे त्यांच्यासाठी हे एक चांगला पर्याय आहे. कुट्टूच्या पिठात भरपूर पोषक तत्वे असतात आणि त्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत. या लेखात आपण सविस्तरपणे समजून घेऊया.

**कुट्टूच्या पिठाचे फायदे**

**१. पोषक तत्वांनी समृद्ध:** कुट्टूचे पीठ हे प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, फॉस्फरस, मँगनीज आणि झिंक यांसारख्या पोषक तत्वांचा चांगला स्रोत आहे.

**२. ग्लूटेन-मुक्त:** कुट्टूचे पीठ ग्लूटेन-मुक्त असते, म्हणून ज्यांना ग्लूटेनची ॲलर्जी आहे त्यांच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे.

**३. हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर:** कुट्टूचे पीठ हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्यात फायबर आणि मॅग्नेशियम असते, जे कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

**४. पचनाच्या आरोग्यासाठी फायदेशीर:** कुट्टूचे पीठ पचनाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्यात फायबर असते, जे बद्धकोष्ठता टाळण्यास आणि आतड्यांचे आरोग्य सुधारण्यास मदत करते.

**५. वजन कमी करण्यास मदत होऊ शकते:** कुट्टूचे पीठ वजन कमी करण्यास मदत करू शकते. त्यात फायबर आणि प्रथिने असतात, ज्यामुळे तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते आणि कमी खाण्यास मदत होते.

**६. मधुमेहासाठी फायदेशीर:** कुट्टूचे पीठ मधुमेहासाठी फायदेशीर ठरू शकते. हे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकते.

कुट्टूच्या पिठाचा वापर: कुट्टूच्या पिठाचा वापर विविध पाककृती बनवण्यासाठी केला जाऊ शकतो, जसे की: भाकरी, पॅनकेक्स, पकोडा, शिरा, उपमा

# मराठीचे वैभव

## अभिजात मराठी मायभाषा
### डॉ. वीणा सानेकर

अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आनंद उधळून झाला. अभिमान बाळगून झाला. उत्सव उदंड झाले. वेळ ठेपली आहे मराठी भाषक म्हणून स्वतःला सिद्ध करण्याची! आपली जबाबदारी घेण्याची.भाषा जितकी जास्त वापरली जाईल तितकी ती अधिक समृद्ध होत जाते.

आपण मराठीचा वापर जितका कमी कमी करत जाऊ, तितके आपण तिला अधिकाधिक दुबळे करत जाऊ, हे आपण ओळखायला हवे आणि हे चित्र शहरामध्ये अधिक स्पष्ट दिसते. खरे तर कोकण, मराठवाडा, वऱ्हाड अशा वेगवेगळ्या भागातील लेखक त्या त्या प्रदेशातील समाज जीवनाचे चित्रण करीत आहेत. भिल्ल, वारली, कोरकू, गोंड अशा भिन्न भिन्न समाजगटातील लोकांचे जीवन व्यक्त होणे गरजेचे आहे. केवळ अभिजात वर्गाची भाषा श्रेष्ठ नव्हे. प्रमाण भाषा जितकी श्रेष्ठ तितकी बोली भाषा श्रेष्ठ होय. अभिजात भाषेच्या जतन संवर्धनात बोली भाषांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्या त्या बोली भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, लग्नगीते, स्त्रीगीते, सण आणि उत्सवांची गीते यांचा अभ्यास आणि संशोधन म्हणजे एका अर्थी सांस्कृतिक संचिताची जपणूक होय.

अलीकडेच मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे सर्वोत्कृष्ट प्रबंधाचा पुरस्कार डॉ. नेहा सावंत यांना मिळाला. सामवेदी ख्रिस्ती बोली म्हणजे कुपारी बोलीचा चिकित्सक अभ्यास त्यांनी केला आहे. बोली अभ्यासाच्या अत्यंत सूक्ष्म पैलूवर त्यांनी काम केले आहे. त्यासाठी वसई आणि आसपासच्या भागात सर्वेक्षण, मुलाखती अशा संदर्भसाधनांचा त्यांनी उपयोग केला. एखाद्या बोलीचा अभ्यास करणे हे चिकाटीचे काम. संवाद, संपर्क, प्रत्यक्षात ती बोली बोलणारा समाज शोधून त्या समाजाचा अभ्यास करणे हे सर्व अशा प्रकारच्या संशोधनात महत्त्वाचे ठरते.माझी एक विद्यार्थिनी डॉ. समृद्धी म्हात्रे हिने आगरी गीतांना केंद्रस्थानी ठेवून पीएच. डी. पदवीकरिता संशोधन केले. आगरी स्त्री गीतांचे कितीतरी मोठे विश्व आहे.



हे भांडारच तिने या प्रबंधात एकत्रितपणे समोर आणले.

मध्यंतरी माझ्या वाचनात असा संदर्भ आला की, शैलजा मेनन आणि रामचंद्र कृष्णमूर्ती यांनी कन्नड आणि मराठी या दोन भाषांतील अध्ययन अध्यापनाबाबत केलेल्या अभ्यासावरून खालील निष्कर्ष मांडले.

**१) शिक्षणक्षेत्रात किंवा पाठ्य पुस्तकात मुलांच्या मौखिक भाषा आणि बोलींना स्थान नाही.**

**२) मुले वर्गात त्यांची बोली वापरतात तेव्हा शिक्षक त्यांना संवेदनशीलपणे प्रतिसाद देतातच असे नाही.**

हे निष्कर्ष खूप काही सांगणारे आहेत. मुलांनी बोलीचा वापर वर्गात केला की त्या कनिष्ठ असल्याची किंवा त्यावरून त्यांना हिणवण्याची उदाहरणे घडताना दिसतात. मात्र आज ग्रामीण आदिवासी भागात शिक्षक प्रसिद्ध कवितांचे बोलीतून अनुवाद करून घेत असल्याचे कानी येते तेव्हा त्या शिक्षकांच्या कल्पकतेला दाद द्यावी वाटते.बोलीतील शब्दांचा कोश मुलांकडून एकत्रितपणे करवून घेण्याचा उपक्रमदेखील त्यांना देता येईल. दर बारा कोसांवर भाषा बदलते असे म्हणतात आणि हेच तर मराठीचे वैभव आहे.

# अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एस.टी.च्या सर्व बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देणार- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

### - १५ ऑगस्टपासून ऑनलाइन आरक्षणाचीही सुविधा
### - आठ हजार की.मी. प्रवासाची मर्यादा काढणार

**मुंबई,(प्रतिनिधी):** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (रा.प. महामंडळ) बसेसमधून प्रवास करणाऱ्या अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना दिल्या जाणाऱ्या सवलतीत लवकरच सुधारणा केली जाणार आहे. तसेच काही नवीन सवलती देखील लागू करण्याचा प्रस्तावही शासन पातळीवर विचाराधीन असून, याबाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एस.टी.च्या सर्व बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येणार आहे. एसटी बस सीट आरक्षित करण्यासाठी १५ ऑगस्टपासून ऑनलाइन आरक्षणाची सुविधा देण्यात येईल तसेच आठ हजार की.मी. पर्यंत प्रवासाची मर्यादाही काढणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. विधान भवनात मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत आधीस्वीकृतीधारक पत्रकारांच्या एसटी बस प्रवासाच्या सवलतींच्या मुद्यावर गुरुवारी बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दीपक भातुसे, खजिनदार विनोद यादव, कार्यकारिणीचे सदस्य प्रशांत बारसिंग आदी पदाधिकारी उपस्थित होते. सद्यस्थितीत अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना साध्या, निमआराम व शिवशाही (आसनी/शयनयान) बसप्रकारामध्ये १००% प्रवास भाड्याची सवलत मिळते. मात्र, या सवलतीवर आठ हजार किमीची मर्यादा आहे. ही मर्यादा रद्द करण्याची मागणी वारंवार होत असून, ती मंजूर करण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. तसेच पत्रकारांना एसटीच्या सर्व बसेस मधून मोफत प्रवास करण्याची सवलत अनुज्ञेय करावी अशी मागणी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत ९ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत केली होती. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. या मागणीबाबत सकारात्मक प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांना एसटी प्रवासासाठी सद्या ऑनलाइन आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध नाही. येत्या १५ ऑगस्टपासून ऑनलाइन सीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना पुढील महिन्यापासून घरबसल्या एसटी बसमधून प्रवास करण्यासाठी सीट आरक्षित करता येईल. या निर्णयांमुळे पत्रकारांना काम करताना अधिक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगत मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मंत्री सरनाईक यांचे आभार मानले.

■ शुक्रवार दिनांक १८ जुलै २०२५

बीड सरकार

पान 3

# विशेष वृत्त

## राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेत मैत्रयी कुलकर्णीचे यश



**बीड:** येथील नादब्रह्म संगीत विद्यालयाची विद्यार्थिनी मैत्रयी अनिकेत कुलकर्णी हिने राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले आहे.सुरताल संगीत विद्यालय, करमाळा जि.सोलापुर या आय एस ओ नामांकन प्राप्त संस्थेद्वारे आषाढी एकादशी निमित्त राज्यस्तरीय भक्तीगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.मैत्रयीचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण प्रा.महेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असुन तिच्या या यशाबद्दल सर्व समाजातुन तिचे कौतुक होत आहे.

## वडवणी येथे वंचित बहुजन आघाडीची बैठक

**वडवणी :** येथील बचत गट भवन वडवणी येथे वंचित बहुजन आघाडीची संवाद बैठक जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी भारीप बहुजन महासंघाचे माजी अध्यक्ष राजाभाऊ ढाले यांच्या स्मृतिदिनी त्यांना अभिवादन करण्यात आले. वडवणी येथील संवाद बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चर्चा करून वडवणी शहरातील वार्ड बाधंनी, नुतन पदाधिकारी संदर्भात चर्चा करून वंचित बहुजन आघाडीचे ध्येय धोरणे राबवून पक्षांचं संघटनात्मक बांधणी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जिवाचं रान करावं असं मत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे यांनी व्यक्त केले. या बैठकीचे प्रास्ताविक युवक तालुकाध्यक्ष विनोद काकडे यांनी केले. तर जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब मस्के यांनी समाजातील विविध समस्यावर शुक्रवारी निवेदन देण्याचे ठरवले आणि कार्यकर्त्यांना सखोल मार्गदर्शन केले. या बैठकीत प्रकाश उजगरे, सुंदर सोनवणे, श्याम उजगरे, प्रेमानंद मोरे, अविनाश साळवे, दक्षराज सौदरमल, अविनाश माने, सचिन डोंगरे, प्रकाश श्रीहरी उजगरे, भिमा आदी उपस्थित होते.

## साने गुरुजी निवासी विद्यालयात गणवेश वितरित

**केज :** येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात केजचे तहसीलदार राजेश गिड्डे यांच्या हस्ते निवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. या प्रसंगी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. या प्रसंगी मार्गदर्शन करताना तहसिलदार राजेश गिड्डे म्हणाले, विद्यार्थ्यांनो शिक्षण घेत असताना गरज म्हणून शिक्षण घ्या. त्याला ऐच्छिक समजू नका. शिक्षण हे ऐच्छिक नसते ती गरज वाटली पाहिजे. गरज वाटते तेव्हाच माणूस यशाची शिखरे पादाक्रांत करत असतो. शिक्षण घेत असताना तीन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत त्या म्हणजे मार्गदर्शन, खरं बोलणे, परिश्रम घेणे या होत असे सांगत त्यांनी विस्ताराने मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्राचार्य डॉ. कविता कराड यांच्यासह सर्व शिक्षक वृंद यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन चोले यांनी केले.

## जनशिक्षण संस्थानला उत्कृष्ट प्रशिक्षण केंद्र पुरस्कार

**बीड :** येथील जन शिक्षण संस्थान बीड द्वारा बीड जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षणाबरोबरच शासनाच्या विविध योजना राबवून लोकांमध्ये जाणीव जागृती केली जाते. या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीडच्या वतीने जन शिक्षण संस्थानला उत्कृष्ट प्रशिक्षण केंद्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्र सरकारच्या पी.एम. विश्वकर्मा या योजनेअंतर्गत दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थान बीड द्वारा मागील वर्षभरात कुंभार, सुतार, न्हावी, माळी व टेलर अशा १ हजार १० कारागिरांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्या सर्वांना प्रत्येकी ४ हजार रुपये मिळाले असून अनेकांना १५ हजार रु व १ लाख रुपये बँक द्वारा कर्ज प्राप्त झाले असून त्याद्वारे त्यांनी त्यांचे उद्योग व्यवसाय विकसित केले आहेत. सर्व लाभार्थी व प्रशिक्षक परिवारासारखे जन शिक्षण संस्थानशी जोडून आहेत. या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जन शिक्षण संस्थान बीडचे माजी अध्यक्ष डॉ. उपेंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. सत्यभामा चोले, संचालक गंगाधर देशमुख व सर्व कार्यकर्ते यांनी स्वीकारला.

## उद्या वसंतराव काळे महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

**बीड :** स्पर्धेच्या आणि गतिमान युगात विद्यार्थ्यांना योग्य करिअर निवड करण्यासाठी व्यापक मार्गदर्शन व्हावे म्हणून आय टी क्षेत्रातील विविध करिअरच्या संधी या विषयावर पुणे येथील आयटी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या उपस्थितीत दि. १९ जुलै रोजी सकाळी १०.३० ते ३.३० वाजेपर्यंत एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.३० वा. बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष रमेश पोकळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीकांत डिसले, तेजाजी शिंदे उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत पुणे येथील आयटी क्षेत्रातील तंज्ञ मार्गदर्शक हिरेनजी केशरिया, गिरीषजी साळुंखे, निमीष हागे, राहुल भालेराव, गिरीश केळकर, डॉ. रविंद्र खेडकर यांचे मार्गदर्शन होणार आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तसेच पालकांनी आणि आयटी क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालय संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## चोरटी वाळू वाहतूक करणारा टेम्पो पकडला

**नेकनूर:** नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत मांजरसुंबा रस्त्यावर बेकायदेशीररित्या शासनाच्या मालकीच्या वाळूचा महसूल बुडवून चोरटी वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी ताब्यात घेतला. दि. १६ जुलै रोजी सकाळी सव्वा अकरा वाजेच्या सुमारास मांजरसुंबा शिवारात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पो.ना.गोविंद राख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेख नामक टेम्पोचालक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टेम्पो (क्र.एम.एच. ०५ आर ७५७६) मध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या दोन ब्रास वाळू आढळून आली. या वाळूची चोरटी वाहतूक केली जात असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी ४ लाख रुपये किमतीच्या टेम्पोसह ३२ हजार रुपये किमतीची वाळू असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अखिल भारतीय भिक्खु संघाचे कार्याध्यक्ष पु.भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांचा उद्या सत्कार समारंभ

**बीड (प्रतिनिधी):-** प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीडच्या विद्यमाने अखिल भारतीय भिक्खु संघाचे कार्याध्यक्ष पु.भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन शनिवार दि. १९/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजता स्थळ तुलशी संगणकशास्त्र व महिती तंत्रज्ञान महाविद्यालय आदर्श नगर डी.पी. रोड बीड येथे करण्यात आले आहे. या सत्कार समारंभास उपासक, उपासिका यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे संयोजक भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संभाजीनगर येथील इंजि.बी.के.आदमाने हे असून प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसिलदार सुहास हजारे, मुख्य कार्यकारी अधिकारी पी.व्ही.बनसोडे, सनधी लेखापाल बी.बी.जाधव, सत्यशोधक ओबीसी परिषदेचे राज्याध्यक्ष संदीप उपरे, राजेंद्र घोडके, मेटा संघटनेचे राज्याध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांची उपस्थिती लाभणार आहे.

अखिल भारतीय भिक्खु संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीडचे अध्यक्ष पु. भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो यांना सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन सन्मान कार्याचा, गौरव महाराष्ट्राचा या अंतर्गत दि. १० जुन २०२५ रोजी मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रदान करण्यात आला आहे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सामाजिक धार्मिक व शैक्षणीक क्षेत्रात आदरणीय भंतेजींचे मोलाचे योगदान आहे. याचा सार्थ अभिमान बीडकरांना आहे. करीता प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था व संबंध बीडकरांच्या वतीने त्यांच्या भव्य जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या सत्कार समारंभास बौध्द उपासक,उपासिका यांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे.



# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या दहाव्या राष्ट्रीय अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे-अर्जुन दळे

**बीड (प्रतिनिधी):-** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे राष्ट्रीय अधिवेशन ७ ऑगस्ट रोजी गोवा येथे संपन्न होत आहे. या अधिवेशनाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह विविध मंत्री व नेते उपस्थित राहणार आहेत. तरी या अधिवेशनास बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी केले आहे.



गोवा येथील पणजी दिनदयाल उपाध्याय स्टेडियम मध्ये अधिवेशनाचे उद्घाटन होईल. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते माजी मंत्री विजय वडेट्टीवार, खा.प्रतिभा धानोरकर, खा.डॉ.नामदेव किरसाण, आ.अभिजीत वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.परिणय फुके आणि अन्य राज्यातील ओबीसी नेते उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय अधिवेशनाला हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहतील अशी माहिती राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अर्जुन दळे यांनी दिली आहे. अधिवेशनात ओबीसींच्या जातीय जनगणनेचा व नॉन क्रिमिलियरचा आवाज बुलंद करण्याचा निर्धार राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी केला आहे. केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना तत्काळ करावी, आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यावरून हटवावी व लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे, त्याच प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूद करून स्वतंत्र केंद्रीय मंत्रालयाची स्थापना करावी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षण पर्वत लागू करावे, क्रिमिलेयरची अट रद्द करून तोपर्यंत ही मर्यादा वीस लाख रुपये करावी यासह अन्य मागण्यावर अधिवेशनात चर्चा करण्यात येणार आहे.

## टाकळी येथे शेतकऱ्याची आत्महत्या

**केज (प्रतिनिधी):** केज तालुक्यात एका ३५ वर्षीय शेतकऱ्याने आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. टाकळी ता. केज येथील सिध्देश्वर घनःशाम घुले वय (३५ वर्ष) या तरुण शेतकऱ्याने १५ जुलै रोजी रात्री ११.३० वाजेच्या नंतर छत्रभुज देवराव घुले यांच्या सर्वे नं.४८ मधील शेतात जाऊन बांधावरील आंब्याच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास लावून आत्महत्या केली. सिद्धेश्वर घुले यांनी आत्महत्या करण्यामागचे कारण आणखी स्पष्ट झाले नव्हते. मयताचा भाऊ विष्णू घनःश्याम घुले यांनी दिलेल्या खबरीवरून केज ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## गुरुवारपासून जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा

**बीड (प्रतिनिधी):** सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा क्रीडा संकुलात येत्या गुरुवार दि. २४ व शुक्रवार दि. २५ जुलै या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेने २०२५-२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ होणार आहे. या स्पर्धा १५ वर्षाखालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत.

दि. २४ जुलै रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर दि. २५ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने दि. २३ जुलै रोजी रात्री १० वाजेपर्यंत स्विकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामन बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या

मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धेनंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विभागस्तर शालेय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा हया बीड येथे दि. २८ ते २९ जुलै रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदानावरच होणार आहेत. विभागस्तर स्पर्धेतील वयोगट निहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

# भारतीय बौध्द महासभेच्या वर्षावास प्रवचन मालिकेचे

बीड (प्रतिनिधी):- दी बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा जि.बीड (पश्चिम) च्या विद्यमाने दि.१० जुलै २०२५ कार्यालय भारतीय बौध्द महासभा बसस्टॅण्ड जवळ बीड येथे सकाळी ११ वाजता जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते वर्षावास प्रवचन मालिका व ग्रंथ वाचन करण्यात आले. सुरुवातीस अध्यक्षा व प्रमुख पाहुणे माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन गुरुजी व पदाधिकारी यांच्या हस्ते आदर्शांचे पूजन झाल्यानंतर सामुदायिक वंदना घेवून कार्यक्रमाचे प्रास्ताविक फळके गुरुजी यांनी केले. तसेच शहरातील नागसेन नगर, पंचशील नगर, चक्रधर नगर, अजिंठा बौध्द विहार महाराष्ट्र हौसिंग कॉलनी, पुरग्रस्त कॉलनी, अंकुश नगर, प्रकाश आंबेडकरनगर आदी ठिकाणी ग्रंथ वाचन व प्रवचनाचे नियोजन करण्यात आले. दर रविवार व पौर्णिमेला केंद्रीय शिक्षिका मार्फत प्रवचन राबविण्याचे ठरविले. कार्यक्रमास हानुमंत कांबळे, प्रशांत वासनीक, राजेंद्र ससाणे, पद्मीनताई गायकवाड, नवनाथ त्रिभवन, अनिल बोराडे गेवराई,निकाळजे बापू, कांताबाई जाधव इत्यादींनी विचार मांडले. शेवटी बौध्दाचार्य चव्हाण यांच्या आभार प्रदर्शनाने येथील कार्यक्रम संपन्न झाला.

तसेच अजिंठा बुध्दविहार म.हॉ.कॉलनी येथे जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पूजन झाल्यानंतर सामुदायिक वंदना घेवून ग्रंथवाचन व वर्षावासाचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी कांताबाई जाधव, त्रिशाला राऊत, पारवे ताई, ठोंबरे ताई, वासनीक ताई, पुष्पा साळवे, संजीवनी गडगे इत्यादींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी व्ही.एन.निसर्गन यांच्या मार्गदर्शनानंतर वार्ड शाखा म.हॉ.कॉलनी सर्वानीमते निवड करण्यात



आली. अध्यक्ष नेहा अमोल पारवे, सरचिटणीस पुष्पा सतीष गवारे, कोषाध्यक्ष सरस्वतीताई जाधव, हिशोब तपासणीस अनुश्री धम्मा पारवे, उपाध्यक्ष संस्कार विभाग संध्या मस्के, पर्यटन उपाध्यक्षा जोत्सना हर्ष साळवे, संरक्षण उपाध्यक्ष वर्षा प्रमोद डोंगरे, सचिव संस्कार विभाग वर्षा कांबळे, पर्यटन सचिव सविता भालेराव, कार्यालयीन सचिव अनिता जाधव, संघटिका प्रमिला भोसले, रत्नमाला चांदमारे, जनाबाई कांबळे, मंदाताई सोनवणे, मिरा साळवे या प्रमाणे सर्वानुमते वार्ड शाखा निवड करुन सर्वांचे जिल्हा शाखेच्या वतीने स्वागत व अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आभार मायाताई पारवे यांनी मानले सरणात्तयाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अरण तीर्थक्षेत्रासाठी महायुती सरकारकडून १५०.२३ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर!

## महायुती सरकारचे अॅड.सतीश शिंदे यांनी मानले आभार!

**बीड (प्रतिनिधी):-** संत शिरोमणी श्री सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र अरण (ता. माढा, जि. सोलापूर) येथील संजीवन समाधी विकासासाठी ग्रामविकास विभागामार्फत १५०.२३ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. ही अत्यंत आनंददायक व अभिमानास्पद बाब असल्याचे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष अॅड. सतीश शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित सर्व मंत्र्यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने आभार मानले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, मंत्री ना.अतुल सावे, व मंत्री ना.जयकुमार गोरे मंत्री ना.छगनराव भुजबळ यांचे महात्मा फुले युवा दलाच्या वतीने अॅड. सतीश शिंदे यांनी आभार मानले आहेत.

सन २०२४ मध्ये श्रीक्षेत्र अरण येथे पार पडलेल्या भूमिपूजन सोहळ्यात तत्कालीन उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी 'अ' वर्ग दर्जा व तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची घोषणा केली होती. सावता महाराजांच्या समाधी सोहळ्या दरम्यान माळी समाजाने केलेले प्रभावी शक्ती प्रदर्शन व समाजबांधवांचा मोठा सहभाग पाहून मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी अरण तीर्थक्षेत्राच्या सर्व मागण्यांना मान्यता देत तीर्थक्षेत्र विकासाला गती देत त्याचीच पूर्तता म्हणून आज एक वर्षाच्या कालावधीतच मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पूर्ण केला आहे.



हे यश संपूर्ण समाजाचे आहे! या निधीमुळे श्री क्षेत्र अरणच्या सर्वांगीण विकासाला आता नवे रूप मिळणार असल्याचे अॅड. सतीश शिंदे यांनी म्हटले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुण्यतिथी निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन

**बीड (प्रतिनिधी):-** येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल, सचिव अॅड.व्ही.बी.मगर सर्व संचालक, या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी अतिसामान्य प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या लेखणीच्या आणि कृतीच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित,वंचित, मागास घटकांसाठी आपल्या जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत कार्य केले. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी याप्रसंगी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे कार्य शब्दबद्ध करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन संतोष मेश्राम, प्रास्ताविक विजय देशमुख आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक आर.बी. घुले, यु.बी.पवळ, श्रीमती एन.जी.मुंडे, आनंद छात्रालयाचे अध्यक्ष डी.व्ही. खरसाडे, शिक्षकेतर कर्मचारी भारत कोळेकर, एल.बी.हजारे आणि एस.एस. गायकवाड सह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



# बाळ मृत घोषित केले; स्वारातीचे ४ डॉक्टर सक्तीच्या रजेवर




## विभागप्रमुखांना नोटीस : अहवाल संचालकांना सादर

अंबाजोगाई (सरकार): जिवंत बाळ मृत घोषित केल्याप्रकरणी सेवेतील चार डॉक्टरांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. स्त्रीरोग प्रसुती विभागाच्या विभागप्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. येथील स्वारातीचे ५ अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी ही कारवाई केली आहे.

येथील स्वाराती रुग्णालयात केज तालुक्यातील होळ येथील महिलेची प्रसुती झाल्यांनतर जन्मलेले जिवंत बाळ डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. गावी अंत्यविधीसाठी नेल्यावर बाळ रडू लागले होते. त्यानंतर त्याला पुन्हा उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. परंतु, बाळाचा तीन दिवसांत मृत्यू झाला. ’

याप्रकरणी चौकशीसाठी पाच सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. त्यांनी अहवाल सादर केल्यावर त्यावेळी कार्यरत चार डॉक्टरांना सक्तीच्या रजेवर पाठवले, तर विभागप्रमुख डॉ. गणेश तोंडगे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या घटनेचा अहवाल वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचे संचालक यांना पाठविण्यात आला असून, या अहवालानुसार पुढील असून, या अहवालानुसार पुढील कार्यवाही होणार आहे.

बालरोगतज्ज्ञांचा सल्ला

न घेणे निष्काळजीपणाचे आठवड्यांपूर्वीच झालेली असून, याला होळ येथील महिलेची प्रसुती २७ अबॉर्शन म्हणतात. बाळ ९०० ग्रॅम वजनाचे होते. बाळाला श्वास घेता येत नव्हता. त्याच्या फुफ्फुसांची पुरेशी वाढ नसल्याने अबॉर्शनचे बाळ सहसा मृतच असते. मात्र, बालरोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे जरुरीचे होते. या निष्काळजीपणामुळे चौघांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे असे अधिष्ठाता, डॉ. शंकर धपाटे, स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय, अंबाजोगाई यांनी सांगितले आहे.

## मंगलाताई सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा

माजलगाव (सरकार) शिक्षण, मातृत्व आणि नेतृत्व यांचे प्रतीक असलेल्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे एक भव्य अभिष्ट चिंतन सोहळा आणि सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन २० व २१ जुलै २०२५ रोजी करण्यात आले आहे.



माजलगावकरांसाठी सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी

२० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम लोकनेते सुंदररावजी सोळंके महाविद्यालय,माजलगाव येथे संपन्न होणार आहे.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ डॉक्टर डॉ. प्रकाशराव आनंदगावकर असतील. तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती राजश्रीताई हेमंत पाटील (अध्यक्ष, गोदावरी समूह, नांदेड) यांची उपस्थिती लाभणार आहे. या वेळी मा. आ. प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा), मा.मोहनरावकाका सोळंके( माजी आमदार), मा. मा. राधाकृष्ण अण्णा होके पाटील( माजी आमदार), मा. बाजीराव भाऊ जगताप ( माजी आमदार), बाबुराव पेहेरे,आरजी.बजाज, मा. जयसिंग सोळंके, मा. विरेंद्र सोळंके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमातील सत्कारमूर्ती सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून मराठवाड्यात अनाथांची माऊली अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव या प्रसंगी करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. या कार्यक्रमात सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजसेवेचा एक महत्वपूर्ण संदेश देण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता थिएटर ऑफ रेलेव्हन्स तर्फे द अदर वर्ल्ड हा मराठी नाट्यप्रयोग सादर होणार आहे.

तसेच २१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता गझल संध्या या गझल गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. दुर्गेश सोनार (मुंबई) असतील तर दत्तप्रसाद जोग, अमिता पैठणकर, आबेद शेख, आत्माराम जाधव, अविनाश काठवटे असे नामांकित गझलकार उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर हे करणार आहेत.आयोजनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येणार असून, समाजसेवेचा आदर्श ठरलेल्या मंगलाताई सोळंके यांच्या कार्याचा गौरव करण्याचा हेतू आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

## पत्रकारांसाठी रविवारी एक दिवसीय कार्यशाळा

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते होणार उद्घाटन

बीड (सरकार): माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एक दिवसीय कार्यशाळा रविवार, २० जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात होणार आहे.




मूळ वर्धा जिल्ह्यातील व सध्या परभणीमध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ महाविद्यालयात शिक्षक असलेले दीपक रंगारी ‘वृत्तसंकलन-संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व’, माध्यम तज्ज्ञ आणि पत्रकारितेची पायवाट आणि संरक्षण पत्रकारिता या ग्रंथांचे लेखक प्रा. शिवशंकर पटवारी ‘कृत्रिम बुद्धीमत्ता आणि पत्रकारिता’ या विषयावर तर ‘समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये’ यावर छत्रपती संभाजी नगर येथील माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे मार्गदर्शन करणार आहेत. अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी आदी पत्रकारांसाठी असलेल्या योजनांबाबत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके माहिती देणार आहेत. या कार्यशाळेत सर्व पत्रकार बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक १९ रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड (सरकार): उद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शनिवार, १९ जुलै रोजी छत्रपती संभाजी नगरहून मोटारीने गेवराई येथे दुपारी एक वाजता आगमन. कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कोल्हेर रोड वरील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी ४ वाजता मोटारीने पुसद, जि. यवतमाळकडे प्रयाण

## प्राचार्य सिद्दीकी नवीद यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात संपन्न

बीड (सरकार): शहरातील नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्दिकी नवीद हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा संस्थेकडून सेवापूर्ती सोहळा थाटात साजरा करण्यात आला.



या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिराजोद्दीन देशमुख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुभाषचंद्रजी सारडा, डॉ. आदिती सुभाषचंद्रजी सारडा (संचालिका – आदित्य शिक्षण संस्था, बीड), ख़्वाजा फरीदोद्दीन देशमुख (सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी), युसुफजई नसरुल्लाह खान (सदस्य, प्रियदर्शनी एज्युकेशन ट्रस्ट बीड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पालवण येथून ७/१२ कोरा.. शेतकरी संवाद दौरा सुरुवात



बीड (सरकार): कर्जमाफी वरून शेतकऱ्यांमध्ये सरकारविरुद्ध प्रचंड संताप आहे.. आश्वासन देऊनही सरकार कर्जमाफी देत नसल्याने आता बीड जिल्ह्यातही शेतकऱ्यांचे आंदोलन उभे राहत आहे.. पालवण (तालुका बीड) येथे आज शेतकऱ्यांशी संवाद साधत ७/१२ कोरा अभियान धनंजय गुंदेकर यांनी सुरू केले आहे..

यावेळी शेतकऱ्यांनी बँकेकडून आलेल्या नोटीस दाखवल्या.. सक्तीने कर्ज वसूल करणाऱ्या बँकांचा यावेळी निषेध नोंदवण्यात आला.. पिकाला योग्य भाव नाही, उत्पन्न निघत नाही अशात निसर्ग प्रचंड बेभरवशी राहत असून यंदा दुबार पेरणीचे संकट असल्याने कर्जमाफी मिळायलाच हवी अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली...

संवाद दौरा बैठकीवेळी श्रावण मस्के, शिवाजी मस्के, पिनू जटाळ, दिनकर जटाळ, गंगाधर मस्के, आत्माराम पवार, अश्रुबा नजान, विनायक जटाळ, बाबासाहेब मस्के, अशोक पवार, विलास मस्के, गोविंद मस्के, अशोक शेळके, शुभम मस्के, बालू मस्के, लक्ष्मण मस्के, माऊली साबळे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.. बैठक समन्वय अशोक पवार यांनी केले.

## ढेकनमोह-जुजगव्हाण शिव पानंद रस्ता तहसीलदार शेळके यांनी केला खुला

बीड (सरकार)तहसीलदार शेळके यांनी गुरुवारी (१७ जून रोजी ) ढेकणमोहा ग्राम पंचायतला भेट देऊन गावातील लोकांच्या समस्या व पिक विमा संदर्भात अडचणी जाणून घेतल्या . गावातील लोकांचे फार्मर आयडी काढुन घेण्याचे आवाहन केले.ढेकणमोहा-जुजगव्हाण शिवेवरुन जाणारा अंतर्गत वादाने अडवलेल्या रस्त्याची तक्रार प्रलंबित होती . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सुनावणी घेवुन रस्ता खुला करण्याचा आदेश दिला होता . तथापि काही शेतकऱ्यांनी आपसात असलेल्या वादामुळे शिवरस्ता होऊ दिला नव्हता सुमारे तीन किलोमीटर रस्त्यांपैकी एक किलोमीटर रस्ता लोकसहभागातून करण्याचे राहून गेले असल्याचे शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले.

कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत हा रस्ता तात्काळ सामोपचाराने या वेळी खुला करण्यात आला.महाराष्ट्राचे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची ,शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत . विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न महसूल अधिकाऱ्यांमार्फत सोडवण्यास सुरुवात केली आहे

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावीत असे सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो



ग्राम महसुल सज्जा ढेकणमोहा अंतर्गत येणाऱ्या मौजे ढेकणमोहा व जुजगव्हाण या दोन गावांच्या शिवेवर असणाऱ्या ब्रम्हनाथ वस्ती कडे जाणारा पाणंद रस्त्याच्या मागणीवरून अर्जदार दादासाहेब नामदेव थापडे व इतर ७ जण यांनी केली होती . ढेकणमोहा – नाळवंडी रोडपासुन ते जुजगव्हाण तलाव पर्यंत जाण्यायेण्यासाठी पूर्वापार हा दक्षिण – उत्तर जाणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन गुरे-जनावरे व शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग , व्यवसाय करत आहेत . गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार चालत आलेला आहे परंतु तो रस्ता पुर्णपणे आमच्या बाजुच्या शेत जमिनीमधुन काढलेला आहे असे म्हणुन रस्ताचे सुरू असलेले काम बंद करुन खडी व मुरूम टाकु न देता तो मध्येच अडवला होता . गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदार यांनी स्वतः स्थळ पाहणी केली व अर्जदार व गैरअर्जदार यांना रस्त्याचे व दळणवळणाचे महत्त्व सांगुन रस्त्यामुळे शेती उत्पादन कसे वाढवावे याकडे लक्ष देण्यास सांगितले . त्याचे महत्त्व शेतकरी यांना कळाले . दोन्ही बाजुच्या शेतकरी यांना सामोपचाराने समजावून सांगितले व मागील वर्षाभरा पासून चालत आलेला वाद मिटवला . जाण्या- येण्यासाठी ढेकणमोहा व जुजगव्हाण या गावच्या शिवावरुन २० फुटाचा रस्ता करावा अशी भूमिका शेतकरी यांनी घेतली . त्यानुसार हा रस्ता करून देण्यात आला .

तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , ढेकणमोहा यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करण्याबाबत यापूर्वीच आदेशित केले होते . तहसीलदार शेळके यांच्या आदेशानंतर स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले.

यावेळी कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके , ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच शिवाजी गाडीवान , ग्राम विकास अधिकारी बाबुराव तांदळे , उपसरपंच परमेश्वर थापडे , तंटा मुक्ती अध्यक्ष कैलास देवकते , पोलीस जमादार चत्रभुज डापकर , ग्राम पंचायत सदस्य सतिश देवकते , अनंत करांडे , बळीराम थापडे , रावसाहेब थापडे , संजय शिंदे , मिलींद शिंदे , चत्रभुज थापडे , सिद्धेश्वर थापडे , दादासाहेब थापडे , गणेश थापडे , महादेव थापडे , नितीन थापडे , बापुराव थापडे , संदिपान थापडे , शिवाजी जाधव , भारत देवकते , गणेश गलांडे , रमेश गलांडे , दादा जाधव , भगवान थापडे , बालासाहेब थापडे तसेच आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके बीड यांचे आभार मानले .

## सौ.पुष्पाबाई सुलाखे यांचे निधन

बीड (सरकार): मूळ चकलांबा येथील रहिवासी असलेल्या आणि हल्ली मुक्काम बीडमध्ये असलेले सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या पत्नी सौ पुष्पाबाई वय ७० यांचे बुधवारी दुःखद निधन झाले



सौ पुष्पाताई विश्वनाथ (बबनराव) सुलाखे यांचे बुधवार दि १६ जुलै रोजी रात्री १० वाजता बीड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्या ७० वर्षाच्या होत्या,ज्योतिषकार तथा सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या त्या पत्नी होत,त्यांच्या पश्चात एक मुलगा डॉ अमोल सुलाखे आणि तीन मुली,जावई,सून असा परिवार आहे,अंत्यविधी गुरुवार दि १७ रोजी सकाळी भगवानबाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत करण्यात आला.



बीड : शिवसंग्राम चे शहराध्यक्ष तथा स्व. नेते विनायकराव मेटे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मा. सुहासराव पाटील यांच्या पोटावर नुकतीच मोठी सर्जरी करण्यात आली. आज त्यांचा वाढदिवस, शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांची आज सांत्वनपर भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समिती चे माजी सदस्य नवनाथ प्रभाळे, बबन मने, मनोज जाधव, पंकज कुटे, गणेश लोणकर सह आदी.

## मराठवाड्यातील मदतमाश जमिनी वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याचा महसूलमंत्र्यांचा आदेश

मुंबई (सरकार): मराठवाड्यातील मदतमाश इनाम वर्ग दोन जमिनी वर्ग एकमध्ये रूपांतरित करण्यासंदर्भात आणि मुंबईतील जमिनींच्या भोगवटा वर्ग बदलाबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानभवनातील त्यांच्या दालनात एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली, या बैठकीत आमदार अतुल भातखळकर आणि आमदार सुनील प्रभू यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते..

बैठकीत मराठवाड्यातील मदतमाश इनाम वर्ग २ जमिनी वर्ग १ मध्ये रूपांतरित करताना आकारण्यात येणारा नजराणा कमी करण्याच्या मागणीवर सविस्तर चर्चा झाली .सध्या शेतसाऱ्याच्या तीनपट नजराणा आकारला जावा, अशी मागणी होत आहे. ही रक्कम अत्यंत कमी असल्याने रेडी रेकनरच्या पाच टक्के दराने रक्कम आकारण्याबाबत चर्चा करण्यात आली. महसूलमंत्र्यांनी या प्रकरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच, या प्रक्रियेत अधिक सुलभता आणण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ अंतर्गत विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले. करण्याचे निर्देश दिले. मदतमाश इनाम म्हणजे काय? मदतमाश इनाम म्हणजे सहाय्य म्हणून किंवा उपजिविकेसाठी प्रदान केलेली जमीन. हैदराबाद इनामे (आणि रोख अनुदाने) नष्ट करणे कायदा १९५४, कलम २ ए अन्वये मदतमाश जमीन खालसा करण्यात येऊ शकते. कलम (६) १ अन्वये सक्षम अधिकाऱ्याकडून चौकशी होऊन आणि वरीलप्रमाणे भोगवटा रक्कम वसूल केल्याची खात्री करुन मदतमाश इनामी ज़मीन नवीन अविभाज्य शर्तीवर भोगवटादार वर्ग २ म्हणून पुनर्प्रदान करण्यात येऊ शकते. हैदराबाद इनामे (आणि रोख अनुदाने) नष्ट करणे कायदा १९५४, कलम ६ (३) अन्वये अशा जमिनीच्या हस्तांतरणास सक्षम अधिकाऱ्याची आवश्यकता होती.

## उपअभियंता मुकुंद आंधळे निलंबित

बीड (सरकार): जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले उपअभियंता मुकुंद चंद्रसेन आंधळे यांना गुरुवारी निलंबित करण्यात आले आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बिल मंजूर करण्यासाठी ८० हजार रुपयांची लाच घेताना त्यांना मागील आठवड्यात रंगेहाथ पकडण्यात आले होते. आंधळे यांच्या विरोधात आलेल्या तक्रारी आणि त्यानंतर झालेल्या चौकशीनंतर शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत ही कारवाई केली आहे. त्यांना आता छत्रपती संभाजीनगर येथील मुख्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)